राज्यातील
नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील
सदस्य पदांच्या सार्वत्रिक व हद्दवाढ
क्षेत्राची तसेच अन्य रिक्त सदस्य
पदांच्या पोट निवडणुकांसाठी
मतदार यादीचा कार्यक्रम-२०२१.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.२/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०२१.

<u>निवडणूक तात्काळ</u>
ई-मेलद्वारे

प्रति,

जिल्हाधिकारी,(सर्व)
(मुंबई शहर व मुंबई उपनगर तसेच पालघर व सातारा जिल्हा वगळून)

**विषय:-** राज्यातील नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक, रावेर व फैजपूर या २ नगरपरिषदांच्या हद्दवाढ क्षेत्राची तसेच अन्य नगर परिषदा/नगरपंचायतींमधील रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम-२०२१.

संदर्भ :- १. आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१२/का-०६, दि.०६/०१/२०२० चे पत्र.
२. आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१२/का-०६, दि.१०/०२/२०२० चे पत्र.
३. आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१२/का-०६, दि.०१/१०/२०२० चे पत्र.
४. आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.६/का-०६, दि.१२/१०/२०२० व दि.१३/११/२०२० (अंशत: सुधारित) चे पत्र.
५. आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.८/का-०६, दि.२९/१०/२०२० चे पत्र.
६. आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.२/का-०६, दि.०२/०३/२०२० व दि.१३/०३/२०२० रोजीचे पत्र. (मतदार यादी कार्यक्रम)
७. आयोगाचे क्र.रानिआ/मनपा २०२०/प्र.क्र.७/का-५, दि.१७/०३/२०२० चे पत्र.
८. आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.२/का-०६, दि.१०/१२/२०२० चे पत्र.
९. आयोगाचे क्र.रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.३/का-०५, दि.०२/०२/२०२१ रोजीचे आदेश.

**महोदय/महोदया,**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. त्यामुळे खाली नमूद केलेल्या नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या माहे एप्रिल, २०२० ते माहे जानेवारी, २०२१ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या तसेच माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये मुदत समाप्त होणाऱ्या सार्वत्रिक/पोट/हद्दवाढ क्षेत्राच्या निवडणुका घेणे आवश्यक आहे.

२. **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रामुख्याने ३ टप्पे असतात :-**

(i) **प्रभाग रचना**

(ii) भारत निवडणूक आयोगाने विधानसभानिहाय तयार केलेल्या मतदार यादीचे Cut-off date रोजी प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय विभाजन

(iii) प्रत्यक्ष निवडणूक

२.१ (i) १३ नगरपरिषदा व ८२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका **(परिशिष्ट-१)**

(ii) **जळगाव जिल्ह्यातील रावेर व फैजपूर या २ नगरपरिषदांच्या हद्दवाढ क्षेत्राची तसेच अन्य २९ नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील एकूण ३३ रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुका (परिशिष्ट-२)**

२.२ राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन क्र.१ ते ५ च्या पत्रांनुसार मुदत संपणाऱ्या नगर परिषदा/ नगरपंचायतींच्या प्रभाग रचना अंतिमरित्या प्रसिध्द झाल्या आहेत.

३. स्थनिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोग स्वतंत्रपणे मतदार यादी तयार करत नसून भारत निवडणूक आयोगाकडून तयार होणारी विधानसभेची मतदार यादी वापरतो. याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदानाचा संभाव्य दिनांक लक्षात घेऊन मतदार यादी तयार करण्यासाठी एक विशिष्ट दिनांक (Cut off date) अधिसूचित केला जातो. (महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम ११ अन्वये)

३.१ तसेच ज्याअर्थी, आयोगाने संदर्भाधीन क्रमांक ९ येथील आदेशानुसार महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमानुसार विधान सभेची मतदार यादी नगर परिषदा/नगर पंचायतींच्या प्रभागानुसार विभागून ती सार्वत्रिक/पोट/हद्दवाढ क्षेत्राच्या निवडणुकीकरिता तयार करणे व अधिकाऱ्यांनी अधिसूचित करणे, या प्रयोजनासठी **दि. १५ जानेवारी, २०२१** हा विहित दिनांक अधिसूचित (Cut off date) केला आहे. (प्रत संलग्न) या विशिष्ट दिनांकास अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करुन वरील निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

४.        **दिनांक १५/०१/२०२१ रोजी** अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे नगर परिषदा / नगरपंचायतींसाठी प्रभागनिहाय विभाजनासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

## आदेश

५.        **मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती :-** दिनांक ०१/०१/२०२१ हा अर्हता दिनांक धरुन भारत निवडणूक आयोगाकडून दिनांक १५ जानेवारी, २०२१ पर्यंत अद्ययावत विधानसभेची मतदार यादी उपरोक्त नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट/हद्दवाढ क्षेत्राच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

याकरिता भारत निवडणूक आयोगाने दि. १५ जानेवारी, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या मतदार यादीच्या आधारे प्रभागनिहाय मतदारांचे विभाजन करण्याची कार्यवाही तात्काळ सुरु करण्यात यावी.

दिनांक १५ जानेवारी, २०२१ पर्यंत संबंधीत मतदार नोंदणी अधिकारी यांनी अंतिम निर्णय घेऊन विधानसभा मतदार यादीमध्ये दाखल केलेली नवीन नावे, दुरुस्त्या इ. नगर परिषदा/नगर पंचायतींनी प्राप्त करुन घ्याव्यात व त्या मतदारांचेही निवडणूक प्रभागनिहाय विभाजन करावे. याकरिता या कार्यालयाचे आदेश क्र.रानिआ-२०१७/प्र.क्र.१९/संगणक कक्ष, दि.२६/१०/२०१७ रोजीच्या आदेशातील सूचनांनुसार कार्यवाही करावी.

६.        वरील मतदार यादी ग्राह्य धरुन उपरोक्त नगर परिषदा/नगर पंचायतींच्या सार्वत्रिक/पोट/हद्दवाढ क्षेत्राच्या निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे राहील :-

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : | दि.१५/०२/२०२१ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : | दि.१५/०२/२०२१ ते दि.२२/०२/२०२१ |
| (iii) | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे | : | दि.०१/०३/२०२१ |
| (iv) | मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे आणि मतदान केंद्र निहाय मतदार याद्या प्रसिध्द करणे | : | दि.०८/०३/२०२१ |

७. **प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-**

७.१ संबंधित मुख्याधिकारी यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे खालील बाबींचा विचार करुन प्रभागनिहाय विभाजन करावे :-

(i) संबंधीत जिल्हाधिकारी यांनी आवश्यक ते विधानसभा क्रमांक, मतदार संघ व यादी भाग क्रमांक इ. प्रमाणे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून आवश्यक विधानसभा मतदार संघाची मतदार यादी प्राप्त करुन घ्यावी.

(ii) सोबतच्या **परिशिष्ट-१** व २ मध्ये नमूद नगर परिषदा/नगर पंचायतीच्या सार्वत्रिक/पोट/हद्दवाढ क्षेत्राच्या निवडणुकांकरिता आयोगातील संगणकीकरण कक्षाकडून तयार केलेले यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त करुन घ्यावे.

(iii) यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त झाल्यानंतर Election Assembly Master, Ward Master इ. अपलोड करावे. कंट्रोल चार्ट तयार करुन तो योग्य असल्याची खात्री करावी व तो योग्य असल्याची खात्री करुन संगणक प्रणालीमधून आपल्या स्तरावर मतदार यादीच्या PDF तयार करुन घ्याव्यात.

७.२ **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-**

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित नगर परिषदा/नगर पंचायतींच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि नगर परिषदा/नगरपंचायतींसाठी तयार केलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे. म्हणजेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधीत प्रभागातील सर्व मतदार, प्रारुप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अथवा प्रभागाच्या हद्दीबाहेरील मतदार, त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत याची खात्री करावी.

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/ प्र.क्र.६/का-५, दि.२४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी. तसेच दुबार नावांसमोर विधानसभा निवडणुकांप्रमाणे विशिष्ट चिन्हे करुन अशा मतदारांच्या ओळखीचे पुरावे काटेकोरपणे तपासावेत.

क) मयत अथवा स्थलांतरित मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्र.-रानिआ/मनपा-२०१०/ प्र.क्र.४/का.५, दि.११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ड) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे

इत्यादीबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

७.३ महाऑनलाईनतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने परिशिष्ट-१ व २ मध्ये नमूद केलेल्या नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट/हद्दवाढ क्षेत्राच्या निवडणुकांकरिता प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन करावे. (https://localbodyvoterlist.maharashtra.gov.in)

८. **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला संबंधित मुख्याधिकारी यांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

९. **प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन संबंधीत मुख्याधिकारी यांनी प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-**

९.१ संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दि.१५/०२/२०२१ ते दि.२२/०२/२०२१ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल.

(i) लेखनिकांच्या काही चुका.

(ii) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, नगर परिषदा/नगर पंचायतींच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

९.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर संबंधीत जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात.

१०. संबंधीत मुख्याधिकारी यांनी अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करुन त्याबाबतची सूचना विहित तारखेस प्रसिध्द करण्यात यावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

११. प्रारुप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस मुख्याधिकारी यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

(i) नगर परिषदेचे/नगर पंचायतीचे मुख्य कार्यालय, प्रभाग समितीचे कार्यालय व इतर कार्यालयातील सूचनाफलक.

(ii) स्थानिक वृत्तपत्र

(iii) नगर परिषद / नगर पंचायतींच्या तहसील कार्यालयाचे सूचना फलक.

(iv) स्थानिक केबल टि.व्ही.

(v) जिल्हाधिकारी व नगर परिषदा/नगर पंचायती यांचे संकेतस्थळ, इत्यादी.

१२. मतदार यादीचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखाद्या नगरपरिषदेच्या/नगरपंचायतीच्या सार्वत्रिक/ रिक्त सदस्य पदांच्या पोट व हद्दवाढ क्षेत्राच्या निवडणुकीबाबत न्यायालयाचे / शासनाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास सदर मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

१३. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांची राहील.

१४. आयोगाकडून देण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात आयोगाचे नोडल अधिकारी (संगणकीकरण) यांच्याकडून आज्ञावली प्राप्त करुन घेण्यात यावी. यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यास ई-मेलद्वारे संपर्क साधण्यात यावा, आणि अत्यंत तात्कालीक कारण असल्यास दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा.

**श्री. समीर गंदपवार (संगणकीकरण कक्ष)**
दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२८८६९५० / २२०२२९०९, email - sec.mh@gov.in

१५. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१६. राज्यामध्ये कोरोना विषाणूची (कोव्हीड-१९) महामारी सुरु असल्याने केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषांचे तंतोतंत पालन करुन नमूद नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट/हद्दवाढ क्षेत्राच्या निवडणुकांसाठी **मतदार यादी कार्यक्रम-२०२१** राबवतेवेळी आवश्यक त्या उपाय योजना राबविण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(अविनाश सणस)
प्रभारी सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
५. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, सर्व
६. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
७. संबंधित नगर परिषदा/नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
८. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१०. निवड नस्ती (का-६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

# नगर परिषदा/नगर पंचायतींची नावे

## परिशिष्ट - १ (सार्वत्रिक निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.२/का-६, दि.०२/०२/२०२१ सोबतचे सहपत्र.)

| अ.क्र. | जिल्हा | अ.क्र. | नगर परिषदा/नगर पंचायतींचे नावे | मुदत समाप्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ठाणे | १ | **अंबरनाथ नगरपरिषद** | १७/०५/२०२० |
| | | २ | **कुळगांव-बदलापूर नगरपरिषद** | १७/०५/२०२० |
| | | ३ | मुरबाड न.पं. | २९/११/२०२० |
| | | ४ | शहापूर न.पं. | २९/११/२०२० |
| २ | रायगड | ५ | खालापूर न.पं. | २४/०१/२०२१ |
| | | ६ | तळा न.पं. | २४/०१/२०२१ |
| | | ७ | माणगाव न.पं. | २४/०१/२०२१ |
| | | ८ | म्हसळा न.पं. | २४/०१/२०२१ |
| | | ९ | पोलादपूर न.पं. | २४/०१/२०२१ |
| ३ | रत्नागिरी | १० | मंडणगड न.पं. | २६/११/२०२० |
| ४ | सिंधुदुर्ग | ११ | कसई-दोडामार्ग न.पं. | २३/११/२०२० |
| | | १२ | वाभवे-वैभववाडी न.पं. | २३/११/२०२० |
| ५ | पुणे | १३ | राजगुरुनगर नगरपरिषद | १५/०५/२०२० |
| | | १४ | **चाकण नगरपरिषद** | २३/११/२०२० |
| ६ | नाशिक | १५ | **चांदवड नगरपरिषद** | २९/११/२०२० |
| | | १६ | निफाड न.पं. | २९/११/२०२० |
| | | १७ | पेठ न.पं. | २९/११/२०२० |
| | | १८ | देचळा न.पं. | २९/११/२०२० |
| | | १९ | कळवण न.पं. | २९/११/२०२० |
| | | २० | सुरगाणा न.पं. | २९/११/२०२० |
| | | २१ | दिंडोरी न.पं. | २९/०१/२०२१ |
| ७ | धुळे | २२ | साक्री न.पं. | २६/११/२०२० |
| ८ | नंदुरबार | २३ | धडगाव-वडफळ्या-रोषणमाळ न.पं. | ०८/०२/२०२१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | जळगाव | २४ | **भडगांव नगरपरिषद** | २९/०४/२०२० |
| | | २५ | **वरणगांव नगरपरिषद** | ०५/०६/२०२० |
| १० | अहमदनगर | २६ | अकोले न.पं. | २५/११/२०२० |
| | | २७ | कर्जत न.पं. | २५/११/२०२० |
| | | २८ | पारनेर न.पं. | २५/११/२०२० |
| | | २९ | **जामखेड नपरिषद** | ०७/०२/२०२१ |
| | | ३० | **शेवगाव नगरपरिषद** | ०७/०२/२०२१ |
| ११ | औरंगाबाद | ३१ | सोयगांव न.पं. | २६/११/२०२० |
| १२ | जालना | ३२ | बदनापूर न.पं. | २३/११/२०२० |
| | | ३३ | जाफ्राबाद न.पं. | २३/११/२०२० |
| | | ३४ | मंठा न.पं. | २३/११/२०२० |
| | | ३५ | घनसावंगी न.पं. | २३/११/२०२० |
| १३ | परभणी | ३६ | पालम न.पं. | २६/११/२०२० |
| १४ | बीड | ३७ | केज न.पं. | ०१/०५/२०२० |
| | | ३८ | शिरुर-कासार न.पं. | २६/११/२०२० |
| | | ३९ | वडवणी न.पं. | २६/११/२०२० |
| | | ४० | पाटोदा न.पं. | २६/११/२०२० |
| | | ४१ | आष्टी न.पं. | २६/११/२०२० |
| १५ | लातूर | ४२ | जळकोट न.पं. | २६/११/२०२० |
| | | ४३ | चाकुर न.पं. | २६/११/२०२० |
| | | ४४ | देचणी न.पं. | २६/११/२०२० |
| | | ४५ | शिरुर-अनंतपाळ न.पं. | २६/११/२०२० |
| १६ | उस्मानाबाद | ४६ | वाशी न.पं. | २४/०१/२०२१ |
| १७ | नांदेड | ४७ | **भोकर नगरपरिषद** | ०९/०५/२०२० |
| | | ४८ | हिमायतनगर न.पं. | २४/०१/२०२१ |
| | | ४९ | नायगाव न.पं. | २४/०१/२०२१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | हिंगोली | ५० | सेनगाव न.पं. | ०२/०२/२०२१ |
| | | ५१ | औंढा-नागनाथ न.पं. | ०२/०२/२०२१ |
| १९ | अमरावती | ५२ | भातकुली न.पं. | २९/११/२०२० |
| | | ५३ | तिवसा न.पं. | २९/११/२०२० |
| | | ५४ | धारणी न.पं. | २९/११/२०२० |
| | | ५५ | नांदगाव-खांडेश्वर न.पं. | २९/११/२०२० |
| २० | बुलढाणा | ५६ | संग्रामपूर न.पं. | २५/११/२०२० |
| | | ५७ | मोताळा न.पं. | २५/११/२०२० |
| २१ | यवतमाळ | ५८ | महागाव न.पं. | २६/११/२०२० |
| | | ५९ | कळंब न.पं. | २६/११/२०२० |
| | | ६० | झरी न.पं. | २६/११/२०२० |
| | | ६१ | बाभुळगाव न.पं. | २६/११/२०२० |
| | | ६२ | राळेगाच न.पं. | २६/११/२०२० |
| | | ६३ | मारेगाव न.पं. | २६/११/२०२० |
| २२ | वाशिम | ६४ | मानोरा न.पं. | ०७/०२/२०२१ |
| २३ | नागपूर | ६५ | **मोवाड नगरपरिषद** | १९/०५/२०२० |
| | | ६६ | **वाडी नगरपरिषद** | १९/०५/२०२० |
| | | ६७ | हिंगणा न.पं. | २६/११/२०२० |
| | | ६८ | कुही न.पं. | २६/११/२०२० |
| | | ६९ | भिवापूर न.पं. | २६/११/२०२० |
| २४ | वर्धा | ७० | कारंजा न.पं. | २९/११/२०२० |
| | | ७१ | आष्टी न.पं. | २९/११/२०२० |
| | | ७२ | सेलू न.पं. | २९/११/२०२० |
| | | ७३ | समुद्रपूर न.पं. | २९/११/२०२० |
| २५ | भंडारा | ७४ | मोहाडी न.पं. | २९/११/२०२० |
| | | ७५ | लाखनी न.पं. | २९/११/२०२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ७६ | लाखांदूर न.पं. | २९/११/२०२० |
| २६ | गोंदिया | ७७ | सडकअर्जुनी न.पं. | २६/११/२०२० |
| | | ७८ | अर्जुनी न.पं. | २६/११/२०२० |
| | | ७९ | गोरेगाव न.पं. | २६/११/२०२० |
| | | ८० | देवरी न.पं. | २६/११/२०२० |
| २७ | चंद्रपूर | ८१ | **चिमूर नगरपरिषद** | २९/११/२०२० |
| | | ८२ | सावली न.पं. | २९/११/२०२० |
| | | ८३ | पोंभुर्णा न.पं. | २९/११/२०२० |
| | | ८४ | गोंडपिपरी न.पं. | २८/०२/२०२१ |
| | | ८५ | कोरपना न.पं. | २८/०२/२०२१ |
| | | ८६ | जिवती न.पं. | २८/०२/२०२१ |
| २८ | गडचिरोली | ८७ | मुलचेरा न.पं. | २५/११/२०२० |
| | | ८८ | एटापल्ली न.पं. | २५/११/२०२० |
| | | ८९ | कोरची न.पं. | २५/११/२०२० |
| | | ९० | अहेरी न.पं. | २५/११/२०२० |
| | | ९१ | चामोर्शी न.पं. | २९/११/२०२० |
| | | ९२ | सिरोंचा न.पं. | २९/११/२०२० |
| | | ९३ | धानोरा न.पं. | २९/११/२०२० |
| | | ९४ | कुरखेडा न.पं. | २९/११/२०२० |
| | | ९५ | भामरागड न.पं. | २९/११/२०२० |
| | **एकूण** | | ९५ | |

# नगर परिषदा / नगर पंचायतींची नावे

## परिशिष्ट - २ (हद्दवाढ क्षेत्र व रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.२/का-६, दि. ०२/०२/२०२१ सोबतचे सहपत्र.)

| अ.क्र. | जिल्हा | नगर परिषदा/नगरपंचायतींचे नावे | प्रभाग क्रमांक व जागा क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | रत्नागिरी | रत्नागिरी न.प. | ५-ब |
| | | राजापूर न.प. | १-ब व ६-अ |
| २ | सिंधुदुर्ग | देवगड-जामसंडे न.पं. | ११-क |
| ३ | पुणे | जेजुरी न.प. | ३-ब |
| | | जुन्नर न.प. | ६-ब |
| ४ | सांगली | कवठेमहांकाळ न.पं. | १७ |
| | | जत न.प. | ५-ब |
| | | कडेगांव न.पं. | १ |
| ५ | सोलापूर | पंढरपूर न.प. | ८-अ |
| | | दुधनी न.प. | १-अ |
| ६ | कोल्हापूर | शिरोळ न.प. | ६-अ |
| | | इचलकरंजी न.प. | ५-अ |
| ७ | नाशिक | सटाणा न.प. | १०-अ |
| ८ | धुळे | शिरपूर वरवाडे न.प. | १४-ब |
| ९ | जळगाव | भुसावळ न.प. | २४-ब |
| | | **रावेर न.प.** | **हद्दवाढ क्षेत्राची** |
| | | **फैजपूर न.प.** | **हद्दवाढ क्षेत्राची** |
| १० | औरंगाबाद | सिल्लोड न.प. | १२-अ |
| ११ | उस्मानाबाद | उस्मानाबाद न.प. | १३-अ |
| १२ | बीड | बीड न.प. | १५-अ |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | लातूर | अहमदपूर न.प. | ५-अ |
| | | निलंगा न.प. | ६-अ |
| १४ | अमरावती | चांदुर रेल्वे न.प. | ३-ब |
| १५ | अकोला | अकोट न.प. | ३-अ |
| | | तेल्हारा न.प. | १-अ |
| १६ | यवतमाळ | पुसद न.प. | ८-अ व ११-अ |
| | | दारव्हा न.प. | ६-अ |
| १७ | नागपूर | काटोल न.प. | १-अ व ३-अ |
| १८ | भंडारा | भंडारा न.प. | १६ |
| १९ | चंद्रपूर | बल्लापूर न.प. | ९-अ व १५-अ |
| | | नागभीड न.प. | ४-अ |
| | एकूण | ३१ | ३५ |

माहे एप्रिल-मे,२०२१ या कालावधीत होणा-या महानगरपालिका, नगरपरिषदा / नगरपंचायती,जिल्हापरिषदा व पंचायत समित्या व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक/ रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीसाठी दि.१५ जानेवारी,२०२१ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्याबाबत

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.३/का.५
नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०००३२
दिनांक:- ०२ फेब्रुवारी, २०२१

## आदेश

क्र.रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.३/का-५, मुंबई महानगरपालिका अधिनियम,१८८८(१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १९ (१) (ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९) मधील कलम ७-अ, महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१(१९६२ चा महा.५) च्या कलम १३ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८(१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १०-अ व कलम १२ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, दिनांक १५ जानेवारी,२०२१ या दिवशी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या, या माहे एप्रिल ते मे २०२१ या कालावधीत होणा-या महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील असे अधिसूचीत करण्यात येत आहे.

मा.राज्य निवडणुक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(अविनाश सणस)
प्रभारी सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र